करण्यात आलेल्या कामाचे तपासणी बाबत.

क्रमांक : मुवसं / काआना / रेंस / 194 / 2012.13.

नागपूर, दिनांक : **23 / 05 / 2012**

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),

नागपूर.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक काआवि / ना / रेंस / 188 / 12–13 दिनांक 21 / 05 / 2012.

संदर्भीय पत्राचे अनुषंगाने उप वनसंरक्षक, गोंदिया वनविभाग, गोंदिया यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या वर्ष 2011–12 मध्ये गोंदिया वनविभागात मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केलेल्या कामाच्या तपशीलावरुन सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव वनपरीक्षेत्रात करण्यात आलेल्या क्षेत्रीय कामांची तपासणी निम्न स्वाक्षरीकर्ते यांनी दिनांक 22 / 05 / 2012 रोजी संबंधीत सहायक वनसंरक्षक वनपरीक्षेत्र अधिकारी, सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कर्मचारी यांचे समवेत केली असता, सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे करण्यात आले नसून त्यामध्ये खालीलप्रमाणे गंभीर स्वरुपाच्या अनियमीतता आढळून आल्या आहेत. त्याचा तपशिल सोबतच्या प्रपत्रात जोडण्यात येत आहे.

2.00 वरील प्रमाणे सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव वनपरीक्षेत्रात वर्ष 2011–12 मध्ये मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे कामे न करता तसेच मोक्यावर प्रत्यक्षात कामे न करता रक्कम खर्च करण्यात आली असून शासकीय रकमेचा अपहार करण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे सदर वित्तीय अनियमीततेस जबाबदार असलेले अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चीत होवून त्यांचेवर नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक असून सदर अनियीमत खर्च त्यांचेकडून वसूल होणे आवश्यक आहे. तसेच गोंदिया वनविभागात वर्ष 2011–12 मध्ये मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केलेले सर्व कामाचे तपासणी होणे आवश्यक आहे. सदर अनियमिततेस जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेवर पुढील आवश्यक कार्यवाही आपले स्तरावर करण्यात यावी, ही विनंती. तसेच यापुढे गोंदिया वनविभागात सर्व कार्यवृत्तात मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे कामे करण्याबाबत आपले स्तरावर आवश्यक सूचना उपवनसंरक्षक, गोंदिया यांना देण्यात यावी, ही विनंती.

3.00 गोंदिया वनविभागाची मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे वर्ष 2011–12 मध्ये केलेले कामाबाबत सुधारीत अहवाल उपवनसंरक्षक, गोंदिया यांचेकडून या कार्यालयाचे पत्र क्रमांक मुवसं / काआना / रेंस / 70 दिनांक 20 / 04 / 2012 व समक्रमांक 186 दिनांक 21 / 05 / 2012 अन्वये मागविण्यात आले असून ते अजुनपर्यंत या कार्यालयास अप्राप्त आहे. सदर अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत आपलेमार्फत उपवनसंरक्षक, गोंदिया यांना आवश्यक सूचना देण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र वरीलप्रमाणे

प्रपत्र

| अ.क्र. | कामाचा प्रकार | वर्कींग सर्कल | फेलींग सिरीज | कक्ष क्रमांक | कुप क्रमांक | एकूण क्षेत्र (हेक्टर) | कामाचे क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | NR | IWC | कोहमारा | 1569 | VIII | 94.07 | 50.00 | सदर कुप क्रमांक VIII, कक्ष क्रमांक 1569 ची मोका तपासणी केली असता, सदर कुपात नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (NR) ची कामे मंजूर कार्यआयोजनेप्राणे करण्यात आली नसून प्रत्यक्षात मोक्यावर सुध्दा सदर कामे करण्यात आल्याचे दिसून आले नाहीत. वर्ष 2011–12 मध्ये कुप क्रमांक IX मध्ये कामे करणे आवश्यक असताना कुप क्रमांक VIII मध्ये उपचार नकाशा तयार न करता सदर कामे केल्याचे मोजमाप पुस्तिकेवर दाखविण्यात आले आहे. सदर कुप SCIWC मध्ये येत नसून कुप IWC मध्ये येत असल्याने त्यांचे दस्तावेजावर चूकीचे दाखवून चुकीच्या जागेवर काम केले असल्याचे दाखविण्यात आले आहे. तसेच नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (NR) ची कामे उपचार नकाशातील फक्त B1 क्षेत्रात करणे आवश्यक असताना सरसकट प्रस्तावित संपुर्ण 50 हेक्टर क्षेत्रावर काम केल्याचे दाखविण्यात आले आहे. नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (NR) चे कामाचे नावावर सदर क्षेत्रातील काही झुडपांवर लाल रंगाने पेंट केल्याचे दिसून आले आहे. तसेच सदर क्षेत्रात नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (NR) चे प्रमाण अगदी नगन्य असल्याने सदर कामे या कक्षात करणे आवश्यक नसून कृत्रिम पुर्नउत्पत्ती ची कामे करणे आवश्यक होते. असे वास्तविक असताना सदर कामाकरीता तयार केलेले मोजमाप पुस्तकामध्ये दिनांक 27/01/2012 ते 16/02/2012 या कालावधीत नैसर्गिक पुर्नउत्पत्ती (NR) ची कामे करण्यात आल्याची नोंद असून त्यावर रु 124740/– चा खर्च दाखविण्यात आला आहे परंतू प्रती हेक्टर किती नैसर्गिक झाडे तसेच फुटवे ची साफसफाई व संगोपन केले आहे याची कोणतीही नोंद सदर मोजमाप पुस्तिकेमध्ये करण्यात आली नाही. तसेच सदर कक्षात CBO चे कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेमध्ये दाखविण्यात आले असून सदर कुपात CBO चे कामे करणे आवश्यक नसून प्रत्यक्षातही मोक्यावर CBO चे कामे अजिबात करण्यात आली नाहीत. त्यामुळे मोक्यावर कोणतेही प्रकारचे कामे मंजूर कार्य आयोजनेच्या तरतुदीप्रमाणे करण्यात आले नसून रु 124740/– चा खर्च सदर कामावर दाखवून सदर रक्कमेचा अपहार केले असल्याचे दिसून येते. सदर बाब अतिशय गंभीर असून सदर रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूल करुन त्यांना सदर अनियमिततेस जबाबदार धरुन त्यांचेवर |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. |
| 2 | Bamboo Plantation (PPO) | SCI | खोबा | 2 | IX | 132.533 | 65 | सदर कुपात वर्ष 2011–12 मध्ये निष्कासनाची कामे करणे आवश्यक असताना सदर कुपात कोणत्याही प्रकारचा उपचार नकाशा तयार न करता तसेच सदर कुपात A,B,C व D क्षेत्र निश्चीत न करता सरसकट 65 हेक्टर क्षेत्रावर बांबू रोपवनाकरीता पुर्वपावसाळीचे कामे करण्यात आली आहेत, परंतू सदर कामाचे विचलन प्रस्तावाची मंजूरी आवश्यक असताना कोणत्याही प्रकारचे विचलन प्रस्तावाची मंजूरी न घेता सदर पुर्वपावसाळीचे कामे करण्यात आली आहेत. तसेच बांबू रोपवनाकरीता 45 सेंमी X 45 सेंमी X 45 सेंमी चे खड्डे आवश्यक असताना 30 सेंमी X 30 सेंमी X 30 सेंमी चे खड्डे खोदण्यात आले आहे. तसेच सदर क्षेत्राचे रोपवनाकरीता उपचार नकाशा तयार करण्यात आले नसून मोक्यावर ग्रीड लाईन व बेस लाईन सुध्दा दाखविण्यात आले नसून सदर रोपवन क्षेत्राचा जीपीएस रिडींग सुध्दा घेण्यात आले नाही. त्यामुळे रोपवन क्षेत्राचे मोजमाप करता येत नाही. याशिवाय बरेच ठिकाणी खड्ड्यांचा आकार मापदंडापेक्षा फारच कमी दिसून आले. असे असताना सदर पुर्वपावसाळी कामावर रू. 612547/– चा खर्च तेरावा वित्त आयोग योजनेअंतर्गत खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे. त्यामुळे सदर पुर्वपावसाळी कामे करताना मंजूर कार्य आयोजनेचे पालन करण्यात आले नसून संबंधित सहायक वनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी सदर कामची तपासणी केली नाही, असे दिसून येते. |
| 3 | CBO | SCI | रामघाट | 253 | VIII | 151.400 | 19.90 | सदर कुपाची मोका तपासणी केली असता, सदर कुपात CBO ची कामे अजिबात करण्यात आली नसल्याचे दिसून आले. परंतू सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये दिनांक 10/11/2011 ते 17/11/2011 या कालावधीत सदर कामे करुन घेण्यात आल्याची नोंद असून त्यावर रु.23598/– खर्च करण्यात आले असल्याचे दाखविण्यात आले आहेत. CBO चे कामाअंतर्गत मुख्य कुपाचे काम केल्यानंतर पुढील वर्षी शिल्लक असलेले कामे करणे आवश्यक असताना अशाप्रकारचे काहीही काम सदर कुपात करण्यात आले नाही. सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेवर सदर क्षेत्रात मार्कींग केलेले झाडांचे थुटावर आलेले फुटव्यांपैकी सुदृढ फुटवे दोन बाजूंना एक एक प्रमाणे फुटवे ठेवून सदर थुटासभोवतालचा 1 मीटर व्यासाचा गोलाकार घेरा फावड्याच्या साहायाने मारुन थुटा जवळील पालापाचोळा, गवत, झुडुपे, वेली साफ करण्यात आले, असे नमुद आहे. परंतू मोक्यावर अशा प्रकारचे काहीही कामे दिसून आले नसून मोजमाप पुस्तिकेवर अशाप्रकारचे |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | कोणत्या प्रजातीचे किती झाडांचे फुटवे साफ करण्यात आले, याबाबतची नोंद करण्यात आली नाही. तसेच सदर कामाची तपासणी सहायक वनसंरक्षक व वनपरीक्षेत्र अधिकारी यांचेकडून झाल्याची नोंद सुध्दा मोजमाप पुस्तिकेवर नाही. यावरून सदर कामे करताना मंजूर कार्य आयोजना चे पालन करण्यात आले नसल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे मौक्यावर कोणतेही काम करण्यात आलेले नसल्याने सदर अनियीमत रक्कम खर्च करण्यास जबाबदार असलेले संबधीत अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून वसूल करून त्यांचेवर नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. |
| 4 | Cleaning Works | IWC | दहेगाव | 269 | IV | 79.60 | 67.00 | सदर दोन्ही कुपात कोणत्याही प्रकारचे Cleaning ची कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मौक्यावर प्रत्यक्ष न करता सदर कामावर खर्च केलेले रक्कम अनुक्रमे रू.110952/- व रू.147384/- दाखविण्यात आले आहे. तसेच सदर दोन्ही कुपाचे कामाकरीता उपचार नकाशा सुध्दा तयार करण्यात आला नसून सरसकट अनुक्रमे दिनांक 05/12/2011 ते 13/12/2011 व दिनांक 03/12/2011 ते 14/12/2011 या कालावधीत सदर कामे झाल्याचे मोजमाप पुस्तिकेवर दाखविण्यात आले आहे. परंतू सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेत नोंद केल्याप्रमाणे सदर क्षेत्रात कोणत्याही झाडाचे संगोपनाची कामे किंवा नैसर्गिक पुर्नउत्पत्ती ची कामे करण्यात आले नाही. याशिवाय मोजमाप पुस्तिकेत नोंद केल्याप्रमाणे सदर क्षेत्रात कोणत्याही थुटाचे ड्रेसिंगचे कामे तसेच शेंडेमोड, दबलेली खुरटी झाडे व कटवर्गीय वेली कापण्याचे काम केल्याचे सुध्दा दिसून आले नाही. त्यामुळे मौक्यावर कोणतेही प्रकारचे कामे मंजूर कार्य आयोजनेच्या तरतुदीप्रमाणे करण्यात आले नसल्याने तसेच मोजमाप पुस्तिकेप्रमाणे प्रत्यक्ष मोक्यावर कोणतीही कामे केली नसल्याने सदर दोन्ही कामांवर अनुक्रमे रू.110952/- व रू.147384/- चा खर्च दाखवून सदर रक्कमेचा अपहार केले असल्याचे स्पष्ट दिसून येते. सदर बाब अतिशय गंभीर असून सदर रक्कम संबधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून वसूल करून त्यांना सदर अनियमिततेस जबाबदार धरून त्यांचेवर नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. |
| | | IWC | पिंपळगाव | 268 | IV | 100.40 | 89.00 | |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

मुख्य वनसंरक्षक,
कार्य आयोजना, नागपूर